दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १३४ वा बुधवार दि.०६ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# विकासाची गंगा अविरतपणे वाहती ठेवण्यासाठी महायुतीला साथ द्या
## आशीर्वाद यात्रेत आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे आवाहन

### सरपंच- उपसरपंचांचा भाजपात प्रवेश
होनमाळ येथील सरपंच किशन हरणे, उपसरपंच तिरुपती शिंदे यांच्यासह सर्वच ग्रामपंचायत सदस्यांनी आ.निलंगेकर यांच्या नेतृत्वात भाजपात प्रवेश केला.असंख्य तरुणही भाजपवासी झाले. त्यांचे स्वागत करून पक्षात सन्मानाची वागणूक देण्याचा शब्द आ.निलंगेकर यांनी दिला.





निलंगा/प्रतिनिधी: केंद्रातील सरकार व राज्यातील महायुतीच्या सरकारने मागील काळात मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत.हा विकास गावागावात पोहोचला आहे.विकासाची ही गंगा अशीच अविरतपणे वाहती ठेवण्यासाठी महायुतीला साथ द्या,असे आवाहन माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

आ.निलंगेकर यांनी मंगळवारी मतदारसंघात आशीर्वाद यात्रा काढली. साकोळ,शेंदप.,होनमाळ, चांभरगा,बोळेगाव, पांढरवाडी,शेंद उ.,दैठणा, सुमठाणा,डिगोळ येथे या यात्रेच्या माध्यमातून आ. निलंगेकर यांनी नागरिकांशी संवाद साधला.

ठिकठिकाणी मतदारांशी बोलताना आ.निलंगेकर म्हणाले की, विरोधक महायुतीने काय केले ? असे विचारत आहेत.विकास झाला नसल्याचा अपप्रचार ते करत आहेत.परंतु सत्ता असताना त्यांनी कोणती विकासकामे केली ? हे विचारण्याची वेळ आता आलेली आहे.

विरोधकांनी जनहिताची कामे केली नाहीत. त्यांच्याकडे नियोजन नाही.विकासाची परिभाषा या मंडळींना ठाऊक नाही.स्वतःचे कर्तृत्व नाही.लोकांसाठी तळमळ नाही.असे लोक केवळ अपप्रचाराचा आधार घेत आहेत.या निवडणुकीत विकासाची गंगा आपल्या दारात आणणाऱ्यांना साथ द्यायची की अपप्रचार करणाऱ्यांच्या सोबत जायचे ? याचा निर्णय आपणास करावयाचा आहे.

प्रत्येक उंबरठ्याचा विकास हे ध्येय घेऊन महायुती सरकार काम करत आहे.त्यामुळेच समाजातील सर्व स्तरातील नागरिकांसाठी विविध योजना सरकारने राबवल्या.लाडकी बहीण, प्रधानमंत्री आवास योजना,उज्वला गॅस, एसटी प्रवासामध्ये ५० टक्के सवलतीत प्रवास आदी योजना सरकारने राबवल्या आहेत.याच पद्धतीने जनहिताची आणखी कामे करण्यासाठी आणि विकासाची गंगा अविरतपणे वाहती ठेवण्यासाठी महायुतीला साथ द्या,असे आवाहनही त्यांनी केले.

साकोळ येथून आशीर्वाद यात्रेचा शुभारंभ झाला.यावेळी आ.निलंगेकर यांनी ज्येष्ठ नागरिकांकडून आशीर्वाद घेतले. लाडक्या बहिणींचे आशीर्वाद व तरुणांच्या शुभेच्छाही त्यांनी स्वीकारल्या.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष मंगेश पाटील,माजी सभापती गोविंद चिलकुरे, अनिल शिंदे,सचिन भिक्का,नवनाथ डोंगरे, संतोष डोंगरे,महेश डुल्हे, ऋषिकेश बद्दे,भानुदास आवाळे यांची उपस्थिती होती.शेंद येथे मान्यवरांसह माधवराव बिरादार,बापू भिंगे, देविदास माने,अशोक पाटील,राजू मोरे,गणेश मोहिते,राजू जाधव,गणेश सलगरे,विशाल गायकवाड,पंकज रक्षाळे, विजय जागले यांनी यात्रेत सहभाग घेतला.

होनमाळ येथे विधानसभा प्रभारी दगडू साळुंके,माजी सभापती धोंडीराम सांगवे,उमाकांत देवंग्रे,शहराध्यक्ष संतोष शेटे,ज्ञानेश्वर चेवले,विनोद शिंदे,मनोज पाटील,ईश्वर बिरादार,सिद्धेश्वर पवार यांची उपस्थिती होती.

# तुमच्या दारात येवून काम करुन देणारे एकमेव लोकप्रतिनिधी
## ना.संजय बनसोडे : माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे

### उदगीरच्या विकासासाठी आपण सर्वजन
पूर्ण ताकदीने ना.संजय बनसोडे यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असुन उदगीर जिल्हा निर्मिती करण्यासाठी सदैव जनतेचा लोकसेवक म्हणून ना.बनसोडे काम करत आहेत. मागील कोरोना महामारीच्या काळात ना.संजय बनसोडे यांनी मतदार संघाची कुटूंबाप्रमाणे काळजी घेतली. महायुती सरकारने मराठा समाजाला विविध योजनेतून माध्यमातुन मदत केली आहे. शेतक-यांचे विजबील माफ केले. लाडक्या बहिणीची योजना आणली. विविध माध्यमातून महायुती सरकारने सर्वसामान्य माणसाला न्याय दिला असल्याचे जिल्हा बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर यांनी सांगितले.

### २) सकाळच्या प्रहरी महिला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
सकाळची प्रहर ही महिलांच्या कामाची वेळ असते. या व्यापातूनही या लाडक्या बहिणी आपल्या लाडक्या भावाच्या पाठीशी उभे राहण्यासाठी उत्स्फूर्तपणे गावोगावी प्रचारात सहभागी होताना दिसत होत्या. लाडकी बहीण योजनेअंतर्गत उदगीर तालुक्यातील महिलांना मोठ्या संख्येने लाभ झाला असून या बहिणी आता संजय भाऊच्या विजयासाठी पुढाकार घेत आहेत.

उदगीर / प्रतिनिधी :- २०१४ च्या निवडणुकीपासून आजतागायत उदगीर मतदार संघाच्या सेवेत एक जनसेवक म्हणून ज्यांनी काम केलं ते ना. संजय बनसोडे यांना आपण २०१९ च्या निवडणुकीत आमदार केले. त्यानंतर त्यांनी मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर उदगीरच्या विकासाचा रथ पुढे घेऊन गेला. तब्बल सहा हजार कोटी रुपयाचा विकास निधी मतदार संघात खेचून आणून सर्वांगीण विकास केला. एखाद्या सर्वसामान्य माणसापासून ते मोठ्या नेत्यापर्यंत सामाजिक असो या वैयक्तिक त्यांची कामे तुमच्या दारात येवून संबंधित कसलेही काम करुन देणारे राज्यातील एकमेव लोकप्रतिनिधी ना.संजय बनसोडे असल्याचे मत ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ गावभेट दौरा निमित्त माळेवाडी, मादलापुर व नेत्रगाव येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते



यावेळी माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, जिल्हा बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर, माजी जि.प. उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी उपसभापती रामराव बिरादार, प्रा.श्याम डावळे, भरत चामले, बालाजी भोसले, शिवशंकर धुप्पे, प्रकाश राठोड, पंडित सुर्यवंशी, बस्वराज बाळे, धनाजी मुळे, डी.वाय. बिरादार, सरपंच रमेश मदनुरे, विजय निटुरे,अनिल मुदाळे, विकास जाधव, अमोल निडवदे, रमेश शेरीकर, धनाजी जाधव, मादलापुरचे सरपंच उदयसिंह मुंडकर, सतिश सुळे महाराज, जितेंद्र शिंदे, किशनराव बिरादार, सूर्यकांत पाटील, उमाकांत दाडगे, बसवराज बाळे, वसंत कडोळे, रंजित कांबळे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.राजेश्वर निटुरे यांनी यांनी, गेल्या ५ वर्षात उदगीरच्या विकासाचा बॅकलॉग ना.बनसोडे यांनी भरुन काढला. ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी व आरोग्याच्या सुविधा पुरविल्या, बंधारे बांधले, बॅरेजेस केले. महापुरुषांचे पुतळे, विविध इमारती उभारल्या मतदार संघातील विविध प्रश्न अतिशय तळमळीने सोडवणारा लोकप्रतिनिधी आम्ही पाहिले नाही म्हणून आम्ही त्यांच्यासोबत आहोत. आपण सर्वांनी मतदानादिवशी आपले महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे यांनाच घड्याळासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन निटुरे यांनी केले. गावभेट दौरा करताना ना.संजय बनसोडे यांचा प्रत्येक गावातील महिलांनी औक्षण करुन आपल्या लाडक्या भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. यावेळी माळेवाडी, मादलापुर, नेत्रगाव, येणकी, जकनाळ, बामणी, शेल्हाळ, शेल्हाळ तांडा, तोंडचिर, यासह विविध गावात ना.बनसोडे यांनी गावभेट दौरा करुन ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी महिला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्धव ठाकरेंनी माजी आमदार रुपेश म्हात्रेंसह अनेकांची केली हकालपट्टी

मुंबई : प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. विधानसभेला उमेदवारी न मिळाल्यामुळे महायुती व महाविकास आघाडीच्या इच्छुकांनी मोठ्या प्रमाणावर बंड पुकारले होते. राज्यभरात १५० पेक्षा जास्त उमेदवारांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केल्यामुळे पक्षातील नेत्यांची आणि अधिकृत उमेदवारांच्या अडचणी वाढल्या होत्या. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीच्या काही अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली, आणि पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी कमी झाली. या दरम्यान पक्षांनी अनेक नेत्यांवर कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे.



पक्षविरोधी कारवाया केल्याने माजी आमदार रुपेश म्हात्रे, विश्वास नांदेकर, चंद्रकांत घुगूल, संजय आवारी, प्रसाद ठाकरे यांची शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख रुपेश म्हात्रे यांची पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील विश्वास नांदेकर-जिल्हाप्रमुख वणी विधानसभा, चंद्रकांत घुगूल झरी तालुकाप्रमुख, संजय आवारी - मारेगाव तालुकाप्रमुख, प्रसाद ठाकरे वणी तालुकाप्रमुख यांचीही पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून ही माहिती देण्यात आली आहे.

# केज विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात २५ उमेदवार नमिताताई मुंदडा,पृथ्वीराज साठे, रमेश गालफाडे यांच्यात होणार तिरंगी लढत

केज/प्रतिनिधी केज विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात २५ उमेदवार उभे आहेत परंतु प्रमुख लढत ही नमिता मुंदडा,पृथ्वीराज साठे, रमेश गालफाडे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. परंतु वंचित बहुजन आघाडीने उमेदवार दिला नाही व त्यांनी अद्यापही कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिला नाही व त्यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट केलेली नाही. तसेच केज मतदार संघामध्ये भीमशक्ती संघटनेचे देखील बऱ्यापैकी पाठबळ आहे परंतु त्यांचाही अद्यापही कोणत्याच उमेदवाराला पाठिंबा नाही. त्याचबरोबर दलित चळवळतील छोट्या मोठ्या संघटनाचा कोणत्या उमेदवाराला पाठिंबा मिळेल हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. महायुतीमध्ये रामदास आठवले यांचा आरपीआय पक्ष हा घटक पक्ष म्हणून सामील आहे परंतु त्यांच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी डावल्यामुळे महायुतीवर आठवले गटाचे कार्यकर्ते नाराज आहेत. महायुतीच्या उमेदवार नमिताताई मुंदडा या आठवले गटाच्या नाराज कार्यकर्त्यांची नाराजी दूर करतील काय? असा सवाल देखील मतदारातून उपस्थित केला जात आहे. नमिताताई मुंदडा यांच्या प्रचारामध्ये आठवले गटाचे कार्यकर्ते दिसून येत नाहीत या नाराजीचा फटका मुंदडा यांना बसेल का?असेही बोलले जात आहे?







विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा प्रचाराच्या निमित्ताने मतदारसंघातील गावोगाव फिरत आहेत व मतदारासोबत संपर्क करत आहेत त्याचबरोबर त्यांनी मागील पाच वर्षात केलेल्या कामाचा आढावा सांगून मतदान रुपी आशीर्वाद द्या म्हणत मतदारांना साद घालत आहेत. तर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे हे मागील पाच वर्षापासून सतत मतदार संघामध्ये नागरिकाशी संवाद साधत सार्वजनिक व वैयक्तिक कार्यक्रमास भेट देत होते. सध्या पृथ्वीराज साठे यांनी देखील प्रचारामध्ये आघाडी घेतल्याचे पाहावयास मिळत आहे त्यांनाही जनतेचा भरभरून पाठिंबा मिळत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफडे हे देखील गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या प्रतिष्ठानच्या माध्यमातून मतदार संघामध्ये नागरिकांशी संवाद साधत आहेत. लोकसभेला त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला होता. गालफडे यांनी देखील शरद पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारीसाठी मागणी कली होती परंतु त्यांना त्यांच्याकडून उमेदवारी मिळाली नाही म्हणून त्यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश करून उमेदवारी मिळवलेली आहे. केज मतदार संघामध्ये बऱ्यापैकी गालफाडे यांचाही संपर्क आहे गालफाडे यांनी गेल्या काही वर्षांमध्ये युवक मेळावा यासारखे छोटे-मोठे उपक्रम राबवले होते होते. या उपक्रमाच्या व जनसंपर्क च्या माध्यमातून ते या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. २०२४ विधानसभा निवडणुकीची लढत ही नमिताताई मुंदडा, पृथ्वीराज साठे,रमेश गालफडे यांच्यात होणार आहे परंतु आरपीआय पक्षाची नाराजी व वंचित बहुजन आघाडीचा कोणत्या उमेदवारास पाठिंबा मिळणार आहे तसेच दलित चळवळतील छोट्या मोठ्या संघटना या कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देणार आहेत अशा चर्चा मतदार संघात ऐकण्यास मिळत आहेत. केज मतदार संघामध्ये आजपर्यंत मनसेने उमेदवार दिलेला नव्हता परंतु या निवडणुकीमध्ये रमेश गालफाडे यांच्या रूपाने मनसेने उमेदवार दिलेला आहे. गालफाडे हे नेमके कोणाचे मतदान किती घेणार हे निवडणुकी नंतरच चित्र स्पष्ट होईल.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# निर्णायक दिवस

दिवाळीच्या चार दिवसांच्या सणानंतर आता पुन्हा महाराष्ट्रातील राजकीय वातावरण आणि निवडणुकांच्या संबंधातील निर्णय यावर सगळ्यांचे लक्ष केंद्रित झाले आहे. आजचा दिवस महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी खूप निर्णायक दिवस ठरला. आज दिवसभरात दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. यातील सकाळची पहिली घडामोड म्हणजे, मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे आणि दुसरा तितकाच महत्त्वाचा निर्णय म्हणजे, निवडणूक आयोगाने राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तातडीने बदली केली आहे. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या राजकारणाच्या दृष्टीने या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या घटना आहेत.

मनोज जरांगे यांनी निवडणुकीच्या संबंधात खूप आधीपासूनच वातावरण तापवले होते. आपले स्वतंत्र उमेदवार उभे करण्याच्या संदर्भात त्यांनी हालचाली चालू केल्या होत्या. त्यांच्यातर्फे उभे केले जाणारे उमेदवार कोणाला राजकीयदृष्ट्या लाभाचे किंवा अडचणीचे ठरणार याची गणिते मांडली जात होती. त्याचबरोबर या निर्णयामुळे मनोज जरांगे यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील नेमकी ताकद किंवा प्रभाव जोखला जाणार होता. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला आपसूकच राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. जरांगे यांनी त्या अनुषंगाने नियोजनबद्ध हालचाली केल्याचेही जाणवले. त्यांनी इच्छुकांचे अर्ज मागवून घेतले, त्यांच्यापैकी काहींच्या मुलाखती पण घेतल्या. त्यानंतर स्ट्रॅटेजीकली उमेदवार उभे करण्याचा निर्णय घोषित केला. या सगळ्या घडामोडी पाहता ते निवडणुकीच्या रिंगणात उतरणारच हे जवळपास निश्चित झालेले असताना त्यांनी अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली आहे. या निर्णयाचे दोन अन्वयार्थ निघतात. त्यातील पहिला अन्वयार्थ असा की, जरांगे यांचा हा निर्णय महाविकास आघाडीसाठी लाभदायक आणि महायुतीसाठी धोकादायक ठरू शकतो. दुसरा अन्वयार्थ असा की, त्यांनी आता निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याने जरांगे यांची झाकली मूठ तशीच राहणार आहे. अन्यथा त्यांनी जर निवडणुकीच्या रिंगणात खरंच उडी घेतली असती आणि त्यात जर त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नसते, तर त्यांचा जो एकूण प्रभाव महाराष्ट्रभर दिसत होता, त्याला ओहोटी लागली असती. त्यामुळे त्यांचा माघारीचा निर्णय चाणाक्षपणाचाच ठरला आहे असे म्हणता येईल. आज जरांगे यांनी जे निवेदन केले आहे, त्यातील एक वाक्य महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या समर्थकांना आवाहन केले आहे की, 'निवडणुकीत कोणाचाही पुरस्कार करू नका किंवा कोणालाही पाठिंबा देऊ नका. गुपचूप मतदान करून आपल्याला जे पाडायचे आहेत त्यांना पराभूत करा'. त्यांच्या आवाहनाचा योग्य संदेश त्यांच्या समर्थकांपर्यंत गेला असून त्यातून आता महायुतीला विशेषतः भाजपला आव्हानात्मक स्थिती निर्माण होणार आहे हे मात्र नक्की. कारण त्यांचा सुरुवातीपासूनचा राग केवळ फडणवीस आणि भाजप यांच्यावरच होता आणि त्यांना पराभूत करण्याची भाषा त्यांनी वेळोवेळी व्यक्त केली होती. भारतीय जनता पक्षासाठी आज दुसरा धक्कादायक निर्णय ठरला तो म्हणजे निवडणूक आयोगाने केलेली पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली. रश्मी शुक्ला या केवळ भाजपसाठीच काम करीत असल्याचा काँग्रेस नेते नाना पटोले आणि अन्य नेत्यांचा स्पष्ट आरोप आहे. रश्मी शुक्ला या सेवेतून अधिकृतपणे निवृत्त झालेल्या असताना त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली गेली. ही मुदतवाढच बेकायदेशीर होती असे विरोधी पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. तरीही महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका लक्षात घेऊन त्यांना पोलीस महासंचालक पदावर नेमले गेले आणि त्यांच्या अखत्यारितच या निवडणुका घेऊन निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा भाजप आणि महायुतीचा प्रयत्न होता, या प्रयत्नाला निवडणूक आयोगाच्या आदेशामुळे खीळ बसली आहे. झारखंडमध्ये 'इंडिया आघाडी'चे सरकार आहे. तेथे भाजप विरोधात आहे, त्या राज्यातही सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे झारखंडच्या पोलीस महासंचालकांना बदलण्याची मागणी भारतीय जनता पक्षाने केल्यानंतर निवडणूक आयोगाने तेथील पोलीस महासंचालकांची त्वरित बदली केली परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडून निवडणूक आयोगाकडे रश्मी शुक्ला यांची बदली करण्याची लेखी मागणी करूनही त्यावर अजून निर्णय होत नव्हता. आज अखेर निवडणूक आयोगाने तो निर्णय घेऊन टाकला. या निर्णयाचे काँग्रेस नेत्यांनी स्वागत केले असले तरी शुक्ला यांना हटवण्यासाठी इतका वेळ का लागला याची माहिती त्यांना हवी आहे. तसेच रश्मी शुक्ला यांना केवळ पोलीस महासंचालक पदावरून हटवणे पुरेसे नाही, तर त्यांना पोलीस सेवेतूनच कायमची सुट्टी द्यावी अशीही काँग्रेसची मागणी आहे. त्याचबरोबर रश्मी शुक्ला यांच्याकडे निवडणुकीशी संबंधित कोणताही कार्यभार सोपवला जाऊ नये अशी आग्रही मागणी आता प्रदेश काँग्रेसने लावून धरली आहे. आजचे हे दोन्ही निर्णय महायुतीसाठी अडचणीचे ठरले आहेत असा निष्कर्ष निघतो. रश्मी शुक्ला यांच्यामार्फत प्रशासकीय यंत्रणेवर दबाव ठेवण्याचा सत्ताधार्यांचा जो प्रयत्न होता त्याला खीळ बसली आहे असे विरोधकांचे म्हणणे आहे, त्यात बर्यापैकी तथ्य आहे. मुळात रश्मी शुक्ला यांच्यावर विरोधी पक्ष नेत्यांच्या फोन टॅपिंगचा आरोप होता आणि उद्धव ठाकरे सरकारच्या काळात रश्मी शुक्ला यांच्याविरोधात त्या अनुषंगाने गुन्हाही दाखल झाला होता. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर विरोधकांचा मांडला जाणारा मुद्दा सहज लक्षात येऊ शकतो. उशिरा का होईना निवडणूक आयोगाने लोकांच्या मनात संभ्रम शिल्लक राहणार नाही असा निर्णय घेत रश्मी शुक्ला यांना हटवले आहे, तो निर्णय लोकशाही प्रक्रियेला अनुकूल असाच म्हणावा लागेल, त्यामुळे या निर्णयाचे स्वागत करणे उचित ठरते.

# बौध्द समाजाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याची गरज!

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेला महान ग्रंथ भ.बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथातील एक उतारा देऊन

एकदा भ.बुध्द गंध्रकुट पर्वतावर राहत होते.त्यावेळी मगधराजा अजातशत्रु वज्जीलोकांवर आक्रमण करण्याच्या विचारात होता.तो स्वतः शीस म्हणाला हे वज्जीलोक कितीही सामर्थ्यशाली असले तरी मी त्यांचा पुरेपूर नाश करेल.म्हणुन आपला मुख्यप्रधान वस्सकार नावाच्या ब्राह्मणाला बोलावले आणि म्हणाला,हे ब्राह्मणा,भगवंताकडे जा आणि नम्रतेने माझ्या वतीने त्यांचे पायवंदन करुन त्यांना विचारा, आपली प्रकृती ठिक आहे ना!आपण सुख आनंद उपभोगीत आहात ना! नंतर त्यांना सांगा की मगधराजा अजातशत्रु वज्जीलोकांवर आक्रमण करण्याच्या तयारीत आहे.त्यांचे म्हणणे आहे की वज्जीलोक कितीही सामर्थ्यशाली असले तरी त्यांचा नाश करेल.अजातशत्रु ब्राह्मणाला पुढे म्हणाला, भ.बुध्द पुढे जे काही सांगतील ते नीट लक्षात ठेव आणि त्यातला शब्दन शब्द मला येऊन सांग, कारण भ.बुध्द कधीही खोटे सांगत नसतात.राजाचे शब्द ऐकून वस्सकार ब्राह्मण म्हणाला ठीक आहे महाराज आपण म्हणता तसेच होईल.आणि अनेक उत्कृष्ट रथावर स्वार होऊन तो गंध्रकुट पर्वताकडे जाण्यासाठी निघाला (बुध्द जेथे राहत होते तेथे)

तेथे पोहचल्यावर तथागतांना अभिवादन करुन त्यांचे कुशल विचारुन राजाने आज्ञा केल्याप्रमाणे मगध राजाचा संदेश त्याने तथागताकडे निवेदन केला. त्यावेळी स्थवीर आनंद भगवंताच्या पाठीमागे उभा होता.तथागत आनंदाला म्हणाले,आनंदा वज्जीलोक वारंवार सार्वजनिक सभा भरवतात, एकोप्याने राहतात,एकोप्याने काम करतात. कोणतेही उद्दिष्ट एकोप्याने मान्य झाल्याशिवाय त्यानुसार वर्तन करीत नाहीत हे तु ऐकले आहेस का? त्यावर आनंद म्हणाला होय भगवान, तथागत पुढे म्हणाले'आनंद जोपर्यंत वज्जीलोक वारंवार सभा भरवतील, एकोप्याने राहतील,एकोप्याने काम करतील,एकोप्याने निर्णय घेतील,जोपर्यंत कोणतेही उद्दिष्ट एकोप्याने मान्य झाल्याशिवाय त्यानुसार वर्तन करीत नाहीत,जोपर्यंत वज्जीलोक आपल्या मधील वृध्दांना मान देतात,त्यांचा आदर करतात,जोपर्यंत आपल्या कुळातील स्त्रिया अथवा कन्येला बळजबरीने डांबून ठेवत नाही,जोपर्यंत वज्जीलोक धम्माला मान देतात (धम्मानुसार आचरण करतात,धम्माचे पालन करतात.)हे आनंदा तोपर्यंत वज्जीलोकांचा कोणीही नाश करु शकणार नाही.उलट त्यांची भरभराटच होत राहील.

तथागत वस्सकार ब्राह्मणाला म्हणाले हे ब्राह्मणा मी वैशाली येथे वज्जीलोकात राहत असताना त्यांच्या कल्याणासाठी वरील गोष्टी कशा आवश्यक आहेत हे त्यांना शिकवले. तथागताच्या म्हणण्यानुसार अजातशत्रु वज्जीलोकांचा पराभव करुन शकत नाही,हे वस्सकार ब्राह्मणाला समजले.तथागतांना अभिवादन करुन तथागथाचा संदेश राजाला सांगण्यासाठी तो निघून गेला.

समाज हा एकसंघ एकत्र असणे किती गरजेचे आहे.आणि त्यामध्ये किती ताकद असते.आणि राजकीय व्यवस्था हि सामाजिक व्यवस्थेवर कशी अवलंबून असते.आणि राज्यकर्त्यांना त्या समाजाचा कसा विचार करावा लागतो.हे यामधून दिसते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, शिका आम्ही शिकलो, संघटीत राहा, आम्ही संघटीत आहो, पण एकत्रीत नाही.संघर्ष करा. आम्ही संघर्ष करतो, पण सत्ता मिळवण्यासाठी नाही.आम्हाला एकत्रित येऊन सत्ता मिळवण्यासाठी संघर्ष करण्याची आज गरज आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की,जा आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा तुम्हाला शासनकर्ती जमात बनायची आहे.बाबासाहेबांच हे स्वप्न साकार करण्यासाठी आम्हाला आता एकत्र यावेच लागेल.

मुक्ती कौन पथे! या पुस्तकामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर एका जागी भाषण करतांना म्हणतात, अस्पृशतेचा प्रश्न हा वर्ग कलहाचा प्रश्न आहे.या कलहातून सुटका करुन घेण्यास तुमच्या पदरी पुरेसे सामर्थ्य नाही.मनुष्यमात्राला तीन प्रकारचे सामर्थ्य आवश्यक असते.मनुष्यबल,द्रव्यबल,आणि मानसीकबल या तीनही गोष्टी त्यावेळी आपल्याकडे नव्हत्या,आम्ही मानसिकदृष्ट्या गुलाम होतो. आमची आर्थिक स्थिती खराब होती. मनुष्यबळ पण अल्प होते. पण आज बाबासाहेबांच्याच पुण्याईने आमच्याकडे मनुष्यबळ आहे,द्रव्यबळ आहे. मानसिकबळ आहे.याच पुस्तकात बाबासाहेब पुढे लिहितात नागरिकत्वाच्या व राजकीय हक्कासाठी आपला लढा पुढे चालू ठेवणे आवश्यकच आहे.आणि याकरिता आपले आपसातले मतभेद,अंतर्गत कलह, विसरुन जाऊन एकजुटीने संघटितपणे आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करणे हेच आपले आजचे कार्य आहे.

समाजासाठी बाबासाहेबांची चार अपत्ये गेली,कितीतरी दु:ख,हाल अपेष्टा,त्यांना सहन कराव्या लागल्या.माता रमामाईला किती तरी दु:ख सोसावे लागले.हा आदर्श आम्हाला आमच्या डोळ्यासमोर ठेवावा लागेल. आलेल्या या विधानसभांच्या निवडणुकीत एकजुट व्हाव लागेल. आमच्याकडे आज मनुष्यबळ आहे,मग आम्ही छोट्याछोट्या गटातटात का विभागनी होऊ द्यायची,कोणीही उठतो दोन चार लोक घेऊन संघटना करतो आणि स्वार्थासाठी ती संघटना दुसऱ्याच्या दावणीला बांधतो, अशाने आपण शासनकर्ती जमात बनणार का? स्वतःच विचार करा. कुठवर चालू द्यायचे असे.

काही लोक म्हणतात नेते एकत्र नाही.ते एकत्र आल्याशिवाय शक्य नाही.दुसऱ्यावर अवलंबून राहून आपले काही नेते मातीमोल झाले.त्यांच्या चळवळी बुडाल्या,आज तेच नेते स्वतःचा स्वार्थासाठी इकडे तिकडे पळत आहेत.ते समाजहितापेक्षा स्वतःचे हित साधण्यासाठी भरकटले आहेत. त्यांना भरकटू द्या,त्यांच्या मागे कशाला जायचे.अशांच्याकडचा जागृतीचा विस्तव विझलेला आहे.

आता जागृतीचा विस्तव ज्या नेत्यांकडे आहे.त्यांच्याच पाठीमागे आम्हाला खंबीरपणे उभे राहावे लागेल.आजरोजी वंचित आघाडीच आपला मोठा पक्ष आहे.महाराष्ट्रभर आहे. आणि प्रकाश आंबेडकरच एकमेव स्वाभिमानी नेते आहेत,की जे स्वार्थासाठी कोणालाही कुठल्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत. त्यांना पण इतर नेत्यासारखे इतर पक्षात राहून स्वतःचा स्वार्थ साधता आला असता. मंत्रीपद मिळवता आले असते.पण त्यांनी तसे केले नाही.ते सदैव समाजासाठी,बहुजनासाठी इथल्या वंचित घटकासाठी झटत आहेत.अशा नेत्यांच्या पाठिशी आम्ही खंबीरपणे उभे नाही का राहायला पाहिजे. ते एकमेव नेते आहेत की जे वंचित घटकांना व समाजाला सत्ताधारी जमात बनवण्यासाठी झटत आहेत.

पण आमच्यामधीलच काही लोक इतरांचे ऐकून त्यांना बीजेपीची बी टिम म्हणतात. बीजेपीकडुन पैसे खातात असेही आरोप करतात.त्यांनी उमेदवार उभे केले की बीजेपीला फायदा होतो असेही म्हणतात.वाट्टेल ते आरोप करतात.आम्ही त्यांना प्रतिउत्तर द्यायला पाहिजे.तर आम्ही त्यांच्यावरच विश्वास ठेवतो.आणि आंबेडकरी घराण्यातील नेत्यावर शंका घेतो. किती शोकांतिका आहे.काही लोकांना विचारले,पैसे घेतल्याचा कोणाकडे तरी काही पुरावा आहे का? ते म्हणतात नाही.इतर लोक सांगतात म्हणून हेही म्हणतात. म्हणजे किती चुकीची विचारसरणी म्हणावी लागेल. त्यांनी उमेदवार उभे केले की बीजेपीला फायदा होतो. असे काही लोक म्हणतात,पक्षाचे उमेदवार उभे करायचे नाहीत.मग पक्ष वाढीस येईल कसा. उमेदवार उभे न करता,निवडणुक न लढवता राजकारणात आपलं अस्तित्व निर्माण होईल का? अस्तित्वच नसेल तर शासनकर्ती जमात बनणार का? आणि जे म्हणतात वंचितच्या उमेदवारामुळे बीजेपीला फायदा होतो, त्यांनी वंचितच्या उमेदवाराला मतदान करावं ना! म्हणजे बीजेपीला फायदा होणार नाही.कारण वंचितकडे गठ्ठा मते आहेत. सपोर्ट करायला काय हरकत आहे. वंचितची सत्ता आली तर सर्व वंचित घटकातील लोकांना मंत्रीपद मिळतील.

काही लोक म्हणतात त्यांनी काँग्रेससोबत युती करायला पाहिजे,पण ज्या काँग्रेसने साठ वर्ष तुमच्या मतावर सत्ता भोगली, पण राजकारणातला तुमचा वाटा तुम्हाला दिला नाही, आणि आजही तो द्यायला तयार नाही.महाराष्ट्रात लोकसभेचे ४८ मतदार संघ आहेत.प्रत्येक मतदार संघात एकट्या बौध्द समाजाचे कुठे तीन लाख,कुठे अडीच लाख,कुठे दोन लाख,तर कुठे दीड लाख असे मतदार आहेत.मग आम्ही समान वाट्याचे भागीदार नाही का? काँग्रेसला आमची मते घ्यावी वाटतात,पण सत्तेतील वाटा द्यावा वाटत नाही.अशी परिस्थिती आहे.हे आम्ही केव्हा ओळखणार. झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत वंचित आघाडीला सोबत घेतले असते,तर मविआचे जवळपास ४५ खासदार महाराष्ट्रातुन निवडून आले असते.पण सत्तेत आम्ही नसलो तरी चालेल पण वंचित घटकातील समाजाला सत्तेत सहभागी होऊ द्यायचे नाही. हि त्यांची नीती, हे आपण केव्हा ओळखणार!

विधानसभेच्या पण महाराष्ट्रात २८८ मतदारसंघ आहेत.या विधानसभेच्या प्रत्येक मतदार संघात एकट्या बौध्द समाजाचे कुठे पन्नास हजार,कुठे चाळीस हजार,कुठे पस्तीस हजार,तीस हजार,वोटर आहेत. पन्नास साठ हजार मते मिळवणारा उमेदवार हा विजयी होईल.मग आम्हाला फक्त थोडा सपोर्ट पाहिजे आमचेच कितीतरी आमदार निवडून येऊ शकतात.त्यासाठी इतर समाज आम्हाला प्रेम, आपुलकी, बंधूभावाने आमच्याशी जोडावा लागेल. आमच्याबद्दल जो द्वेष आणि तिरस्कार पसरवल्या गेला. तो मिटवून, इतर वंचित घटकांना आम्हाला जवळ करावे लागेल.

कारण सत्तेपासून वंचित असलेल्यांना घेऊन सरकार बनवण्याची कुवत व मनुष्यबळ आपल्याकडे आहे.पण आम्ही ते न करता आमच्याच नेत्याला दोष देतो, आरोप करतो,किती लाजीरवाणी गोष्ट आहे.

काँग्रेसने आंबेडकरी चळवळी मोठ्या होऊ दिल्या नाही तर चळवळी संपवल्या.म्हणुन आज कवाडे,आठवले बीजेपीच्या दरबारी गेले.आज त्यांचे अस्तित्व मातीमोल झाले.अशी परिस्थिती आहे. हे आम्ही केव्हा अ ा े ळ ख ण ा र .

मविआ वाले आज आम्हाला सांगतात संविधान धोक्यात आहे. आणि आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवतो.साठ वर्षात त्यांनी कधी संविधानाप्रमाणे कारभार केला का? विचारा त्यांना!.संविधान एवढे पोकळ होते काय हो! की संविधानात एवढ्या दुरुस्त्या कराव्या लागल्या.हे बाबासाहेब आंबेडकर यांच्या पेक्षाही हुशार आहेत का?घटनेत दुरुस्त्या करुन कारभार केला. किती घटनादुरुस्त्या अनुकूल होत्या हे कधी त्यांनी सांगितले काय हो! नाही सांगितले तरी आमचा विश्वास त्यांच्यावरच की ज्यांनी कधी संविधानाप्रमाणे कारभार केला नाही.संविधानाप्रमाणे कारभार केला असता. तर देश सुजलाम सुफलाम झाला असता.पण यांनीच तर साठ वर्षात संविधानाचा सत्यानाश केला. आज तेच आम्हाला सांगतात आरक्षण धोक्यात आहे.मग आता एससी,एसटीच्या उपवर्गीकरणाला क्रिमीलेअरला विरोध का केला नाही.विचारा त्यांना!अशा काँग्रेसच्या नेत्यांवर आम्ही भरवसा ठेवतो.आमच्याच आंबेडकरी वारसावर प्रकाश आंबेडकर यांच्यावर की जे आम्हाला सत्ताधारी जमात बनवण्यासाठी झटत आहेत.त्यांच्यावर शंका घेतो किती दुदैवाची गोष्ट आहे.

पण आता मात्र अशा शंकाकुशंका मनात न बाळगता सर्व बौद्ध समाजाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याची नितांत गरज आहे. बाळासाहेबांनी जे राजकीयदृष्ट्या वंचित आहेत अशा वंचितांना सावली देण्यासाठी जो वृक्ष वाढवला, त्या वृक्षांची जड आणखी मजबूत करण्यासाठी आणि राजकीय सत्तेतील आमचा वाटा आम्हाला मिळावा यासाठी आम्ही एकत्र आलेच पाहिजे. त्याचवेळी आम्ही शासनकर्ती जमात बनू.

या विधानसभेत आम्हाला एकत्र येण्याची सुवर्ण संधी आहे. हि संधी वाया घालवू नका. कोणाच्याही प्रलोभनाला बळी न पडता, आपल्यातील मतभेद विसरुन वंचित आघाडीच्या उमेदवारांलाच मतदान करा.बाळासाहेबांना सपोर्ट करा. इथल्या आदिवासी, ओबीसी, मुस्लिम धनगर, बौध्द, सर्वांसाठी ते लढत आहेत. निश्चितच आपण सत्ताधारी जमात बनू.

------

विनोद सरदार,
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं.९६८९८४७११५

# दक्षिण मुंबईत झेंडा कोणाचा?

दक्षिण मुंबईत कुलाबा, मुंबादेवी, वरळी या उच्चभ्रू वस्तीबरोबरच उमरखाडी, भायखळा, शिवडी हे कष्टकरी जनतेचे विधानसभा मतदारसंघही आहेत. धनाढ्य व गरीब अशा या मिश्र मतदारसंघात कोणाचा झेंडा फडकणार?

यंदा विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर, मंगलप्रभात लोढा, अजय चौधरी, अमीन पटेल, यामिनी जाधव यांच्यासह आदित्य ठाकरे यांची तुल्यबळ उमेदवारांसोबत लढाई होणार आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, अधिकृत व अनधिकृत बांधकामे, दुकाने व्यवसाय करणार्यांच्या जटिल समस्या, फेरीवाले, वाहनतळ, मंत्रालय, विधानभवन, गेटवे ऑफ इंडिया, पंचतारांकित ताज व ओबेरॉय हॉटेल, बड्या उद्योगपतींची निवासस्थाने, नौसैनिक तळ, ससून डॉक, लव्ह ग्रोव्ह पंपिंग स्टेशन व भायखळ्याची राणी बाग, चर्चगेट स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई महानगरपालिका, ब्रेबॉर्न व वानखेडे स्टेडियम, गिरगाव चौपाटी अशी महत्त्वाची स्थळे येथे आहेत. लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजपला खड्यासारखे बाजूला सारून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे अरविंद सावंत यांना मतदारांनी भरघोस पाठिंबा देऊन जिंकवले. एकमेव वरळीचा थोडासा उच्चभ्रू वस्तीचा भाग वगळता उर्वरित पाच विधानसभा मतदारसंघात सावंतांच्या बाजूने मतदान होताना दिसून आले. तथापि, मनसेचे उमेदवार या निवडणुकीत नसल्यामुळे मतदारांनी मराठी खासदारांस पसंती दिली अशी चर्चा नंतर रंगली; परंतु त्यात फारसे तथ्य नव्हते.



तर काम करण्यात पुढे असलेले शिवसैनिक तळागाळापासून उच्चभ्रूंच्या सेवेत अनेक प्रसंगात सोबत राहिल्यामुळे या मतदारसंघात उबाठा शिवसेनेने प्राबल्य मिळवले. त्यामुळे विधानसभेत येथे भाजप व मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे तगडे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असूनही मविआच्या बाजूने येथील मतदार मोठ्या प्रमाणात मतदान करेल असा विश्वास वाटत आहे. परंतु मतदारांना गृहीत धरण्यासारखे हे सहा विधानसभा मतदारसंघ नाहीत. कुलाबाची स्थिती पाहता तिथे वाहनतळ, अनधिकृत दुकाने, फेरीवाले, अनधिकृत बांधकामे, सुशोभिकरण व व पुनर्विकासाचे मुद्दे ऐरणीवर आहेत. परंपरागत कुलाबा मतदारसंघात भाजपचेच वर्चस्व राहिलेले आहे. म्हणूनच २०१९च्या विधानसभा निवडणुकात राहुल नार्वेकर हे निवडून आले. मुंबादेवीतले चित्र मात्र भाजपसाठी फारसे आशादायी नाही. येथे काँग्रेसचे अमीन पटेल यांचे मतदारांशी वैयक्तिक संबंध खूपच जवळचे आहे. दोन वर्षांपूर्वी जातीय तणाव निर्माण होताच त्यांनी घेतलेली नरमाईची भूमिका सर्वांना भावली. म्हणूनच राज पुरोहितांचा २०१९ मध्ये पराभव करणे पटेलांना शक्य झाले होते. यावेळी तर भाजपाच्या विरोधातील एकगठ्ठा मते पटेलांनाच मिळतील अशी अपेक्षा काँग्रेसला आहे. मलबार हिल या उच्चभ्रू वस्तीच्या मतदारसंघात आजवर भाजपचेच प्राबल्य दिसलेले आहे. येथे काँग्रेसचे त्या वेळेचे नेते मिलिंद देवरा सोडले तर मंगलप्रभात लोढा यांच्याशिवाय दुसर्या कोणाचा विचार करणे भाजपालाही शक्य नाही. पक्षातील हा वजनदार नेता गेली अनेक वर्षे मलबार हिलचा गड राखून आहे. मलबार हिलमधील बाणगंगे जवळची कर्मचारी वसाहत असूनही लोढांनी तेथे वाखाणण्याजोगे कार्य केलेले आहे. इथली वाहतूक व्यवस्था काही वेळ जटिल समस्या निर्माण करत होती; परंतु पर्याय सापडत नसल्यामुळे वाहनधारक गुपचूप होते. आता कोस्टल रोड झाल्यामुळे वाहतुकीचा निम्मा ताण कमी झाला आहे. त्यामुळे हा प्रश्न लोढांना त्रास देणारा नाही.

पलीकडल्या बाजूला भायखळा मतदारसंघात महायुतीतील यामिनी जाधव आमदार आहेतच. त्यांचे कार्यही चांगले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'लाडकी बहीण' अशी सध्याची त्यांची ख्याती आहे. सर्व संकट लीलया पार करणार्या नेत्या अशी त्यांची विशेष ओळख आहे. त्यांना तिथे अरुण गवळींची मुलगी गीता गवळी यांचे आव्हान आहे. त्या उबाठामार्फत उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात होत्या. काँग्रेसवाल्यांमुळे गीता गवळींना यश आले नाही. मधु चव्हाणांची तिथे खूप धडपड होती. पण काँग्रेसला एमआयएमच्या वारीस पठणांमुळे या मतदारसंघाची शाश्वती देणे शक्य वाटत नाही म्हणूनच या मतदारसंघांवर सध्या यामिनी जाधव यांचाच प्रभाव आहे असे मानले जाते. शिवडी विधानसभा मतदारसंघात अजय चौधरींमुळे मनसेचे बाळा नांदगावकर यांच्या पुढ्यात आव्हान उभे ठाकले आहे.

मनसेची या मतदारसंघातली बांधणी चुकली असली तरीही भाजपच्या व अधिकृत शिवसेनेच्या छुप्या पाठिंब्याने शिवडीची जागा मनसे पुन्हा आपल्याकडे खेचू शकेल अशी आशा मनसेला आहे. परंतु अजय चौधरीनांही कमी लेखून चालण्यासारखे नाही. एक म्हणजे चौधरी उद्धव ठाकरे यांच्या पडत्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तसेच त्यांनी २०१९ मध्ये राष्ट्रवादीच्या उमेदवाराविरुद्ध विजय मिळवताना तब्बल वीस हजारांहून अधिक मताधिक्य घेतले होते. सद्यराजकीय परिस्थितीत त्यांचे हे मताधिक्य तुटणे उबाठा शिवसेनेला शक्य वाटत नाही. ते मतदारांचा कल आपल्याच बाजूने आहे असे गृहीत धरून कार्य करत आहेत. त्याच्या शेजारचा वरळी मतदारसंघ हा देशाचे लक्ष वेधून घेत आहे.

येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नातू व पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य ठाकरे पुन्हा नशीब आजमावत आहेत. गेल्या वेळी त्यांनी प्रतिस्पर्धी उमेदवाराविरुद्ध मोठे मताधिक्य घेतले होते. यंदा मात्र त्यांना मनसेच्या संदीप देशपांडे यांनी कडवे आव्हान उभे केले आहे. वरळी कोळीवाडा असो बिडीडी चाळीतील रहिवाशांच्या समस्या सोडवण्यात मनसेने पुढाकार घेतला आहे. उमेदवारांची वानवा किंवा ठाकरेंबाबत त्यांच्या गटांत दोन मतप्रवाह आहेत. त्यामुळे सध्यातरी हा मतदारसंघ ठाकरेच कायम राखतील अशी चिन्हे आहेत.

एकंदरीत सर्व विधानसभा मतदार संघाचा विचार करता भाजप-शिंदेंची शिवसेना, काँग्रेस व उबाठा शिवसेना असे या मतदारसंघातील निवडणुकीनंतरचे चित्र असल्याची कल्पना केली जात आहे. तरीही मविआ या मतदारसंघात त्यांचेच उमेदवार जास्तीत जास्त निवडून येण्याची अपेक्षा धरत आहे. महाराष्ट्रातून उद्योग परराज्यात गेले याचा प्रचार इथे घरोघरी झाला आहे. तसेच इथे मराठी टक्का थोडाफार जास्त प्रमाणात मविआच्याच बाजूने आहे असे त्यांचे मत आहे. निकालानंतरच चित्र स्पष्ट झाल्यावर दक्षिण मुंबईत झेंडा कोणाचा फडकेल हे स्पष्ट होईल.

# बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर. आयोजित सातवी अखिल भारतीय बौध्द धम्मपरिषद २५ डिसेंबर रोजी होणार

तथागत बुध्दांचा विचार म्हणजे धम्म होय. माणसाने माणसाशी माणुसकीणे वागणे म्हणजे बुध्दउपदेशित धम्म होय. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि सामाजिक परिवर्तनाच्या मुल्यांचा विचार म्हणजे बुध्दांच्या शिकवणीचा प्रचार आहे. धम्माचे चिंतन आणि अभ्यास हे केवळ धम्म देसनेतून शक्य आहे या करिता सर्वत्र सर्वाथाने, अविरतपणे बुद्धाच्या शिकवणीचा धम्मोपदेश होणे काळाची गरज आहे. या द्वारे जण माणसाच्या मनावर नैतिक संस्कार घडणे व त्यातून मन सुसंस्कारीत करणे हे धम्म शिकवणीचे ध्येय आहे. त्यासाठी धम्म प्रचार प्रभावी माध्यम आहे. बौद्ध धम्म हीच जगातील सर्वप्रथम नैतिक विचार पद्धती असून ज्यामध्ये मानवास आत्म संयमन करण्याची शिकवण दिली गेली. प्रगतशील जगालाही नैतिक शिकवण देण्यासाठी बौद्ध धम्म आवश्यक आहे. तथागत बुद्धाचा नैतिक विचार जण माणसात रुजविणे हा धम्मप्रचार व प्रसार होय. म्हणूनच चक्रवर्ती राजा सम्राट अशोक आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मदक्षिा ही अपूर्व अशी धम्मक्रांती होय. अधुनिक भारतात तथागत बुध्दांचा धम्म पुनश्च भारतामध्ये पुर्नजिवीत करण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. केवळ माणसाला केंद्रबिंदु ठेवून माणसाच्या जीवनाला, मनाला सुखी करण्याचा विचार तथागत बुध्दाच्या उपदेशात, धम्मदेशनेत आहे. माणसाला सदाचारी, सुसंस्कृत, नितीमान, सुविचारी बनविण्यासाठीच धम्माचा प्रचार वेगवेगळया कार्यक्रमातून केला जात असतो. अशा या मानव कल्याण कारी धम्मविचाराचा प्रचार धार्मिक कार्यक्रम, संमेलने वा धम्मपरिषादांमधुन विद्वावान, अभ्यासू, ज्ञानी, भिक्खुगण जनसमुहात शील सदाचाराची शिकवण देत संस्कार करण्याचे कार्य धम्मपरिषद् कार्यक्रमातून होत असते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी केलेल्या धम्मक्रांतीचे बीजारोपन सर्वत्र देशभरात राज्या राज्यात आणि जिल्हा, शहर, तालुका गाव पातळीवर झाले आहे. या धम्मक्रांतीच्या प्रचारासाठी अनेक गाव पुढे आले आहेत त्यामध्ये लातूर जिल्हा देखील धम्म प्रचारासाठी अग्रस्थानी राहिलेला आहे. लातर–उस्मानाबाद या परिसरात प्राचीन तेर नगरात, खरोसा बुध्दलेणी येथील पुरातन अवशेष म्हणजे लातूर जिल्याला तथागत बुध्दांच्या विचारांचा वारसा प्राचीन काळात लाभलेला आहे. शिवाय लातूर शहर हे आंबेडकरी चळवळीचे केंद्र म्हणून ओळखले जाते. तथागत बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या विचारांचा वारसा लातूर येथील कार्यकर्त्यांनी सतत तेवत ठेवण्याचे कार्य सातत्याने केले आहे. लातूरात सर्वप्रथम बुद्ध नगराध्ये वैशाली बुध्द विहाराची स्थापना करुन डॉ. बाबासाहेब यांच्या धम्मक्रांतीचा कार्यरंभ लातूरमध्ये झाला नंतर भदंत उपाली थेरो यांच्या धम्मप्रचाराच्या कार्याने मोठी धम्म जागृती लातूर–उस्मानबाद परिसरात झाली. पू. भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या सातत्यापूर्ण धम्मदेशनेमुळे धम्मचळवळीला गती प्राप्त झाली. गत पाच दशकापासून लातूर जिल्ह्यात धम्मप्रचाराचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातुन होतच आहे. सन १९९४, २००६, २००७, या वर्षात ऐतिहासिक भव्य अशा धम्म परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या प्रयत्नाने २०१६ मध्ये भिक्खु महासंघदान सोहळा अद्वितीय भव्य स्वरुपात संपन्न झाला. त्यानंतर इ.स. २०१७ पासून अविरतपणाने अ.भा. स्तरावर धम्म परिषदांचे आयोजन अखंडितपणे सुरु करण्यात आले आहे. सर्व धम्मप्रेमी उपासक–उपासिका, धार्मिक, सामाजिक, राजकीय, संघटना, महिला मंडळे, आदिजनांच्या सहकार्याने हे धम्माचे कार्य चालू आहे. समाजात हरेक परिवारातील प्रत्येकाच्या मनात बुद्ध विचारांचे चिंतन होण्याकरीता सातत्याने वैचारिकपणे बुद्ध विचाराची धम्मदेसना सर्व काळात अपेक्षित आहे. तो केवळ उद्देश्य समोर ठेवून बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चैरिटेबल ट्रस्ट या लातूर जिल्हयातील बौद्ध संस्थेने पू. भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शना खाली आपल्या लातूर परिसरात धम्म प्रचार करण्यासाठी सर्व उपासक उपासिका यांच्या सहकार्याने महाविहार धम्म संस्कार केंद्राची स्थापना केली. व याद्वारे या पुढील काळात बौद्ध धम्माचा प्रसार या केंद्रा द्वारे करण्याचा संकल्प केला आहे. दरवर्षी लातूर येथील धम्म परिषद साधारणतः ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर या कालावधीत संपन्न होत असते. परंतु संस्थेने ठराव घेवून कायमस्वरूपी २५ डिसेंबर ही एकच तारीख निश्चित केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर दिनी १९२७ सालात मनुष्य मात्राला नीच ठरवलेल्या मनुस्मृतीचे दहन महाड या ठिकाणी केले. तर १९५४ सालात ब्रम्हदेशातून आणलेल्या बुद्धमूर्तीची पहिल्यांदा स्थापना देहू रोड, पुणे या ठिकाणी विहारात केली. व स्त्री मुक्ती दिन अशा या तिन्ही घटना २५ डिसेंबर रोजी ऐतिहासिक असून महत्वपूर्ण आहेत. अशा दिनाचे औचित्य साधून दि. २५ डिसेंबर रोजी पासून लातूरची धम्म परिषद् कायमस्वरूपी येणाऱ्या काळात संपन्न होईल.

आतापर्यंत, बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्या सहकार्याने यशस्वी स्वरुपात २०१७ साला पासून सातत्याने सहा धम्म परिषदा भव्य स्वरुपात संपन्न झाल्या असून प्रतिवर्षा प्रमाणे या ही वर्षी पू. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५ डिसेंबर २०२४ बुधवार रोजी दुपारी ठीक १२:०० वाजता महाविहार धम्मसंस्कार केंद्र सातकर्णी नगर बार्शी रोड, रामेगाव ता. जि. लातूर येथे सातवी अ. भा. बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. अ.भा. भिक्खू संघ शाखा महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष पू. भिक्खू धम्मसेवक महाथेरो (मुळावा) हे परिषदेच्या अध्यक्ष स्थानी असून यावेळी या परिषदेचे उद्धघाटन श्रीलंका येथील माजी खासदार तथा राष्ट्रपतींचे धार्मिक सल्लागार पू. भिक्खु अतुरलीय रतन महाथेरो यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी सातकर्णी स्मरणिकेचे प्रकाशन पू. भिक्खू प्रा. डॉ. एम. सत्यपाल महाथेरो (औरंगाबाद) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात सकाळी ठीक ०८:०० वा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर येथे पंचरंगी धम्मध्वजारोहण, त्यानंतर धार्मिक देखावे व बुद्धमुर्ती सहीत भिक्खू संघ व उपासक–उपासिका यांच्या उपस्थितीत धम्म मिरवणुकीस प्रारंभ होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येवून प्रारंभ शाहू चौक, अण्णाभाऊ साठे चौक गंजगोलाई, हनुमान चौक, बसस्टैंड समोरून गांधी चौक, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे धम्म मिरवणुकीचा समारोप होईल. त्यानंतर मुख्य धम्म ध्वजारोहण पृ.भिक्खू प्रा.डॉ. खेमधम्मो महाथेरो (मुळावा) यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सकाळी ठीक १०:०० वाजता संपन्न होईल. यावेळी देशविदेशातील पू. भिक्खू, गण उपस्थित राहुन धम्मदेशना देणार आहेत.

पू. भिक्खू शरणानंद महाथेरो, पाथरी
पू. भिक्खू प्रा. डॉ. यशकाश्यपायन महाथेरो, जयसिंगपूर पू. भिक्खु दयानंद महाथेरो,मुळावा.
पू. भिक्खू डॉ. इंदवंस महाथेरो,औरंगाबाद
पू. भिक्खू पय्यातिस्स महाथेरो,सिरसाळा
पू. भिक्खू करुणानंद थेरो,औरंगाबाद
पू. भिक्खू धम्मानंद थेरो, अणदूर
पू. भिक्खू ज्ञानरक्षित थेरो,औरंगाबाद
पू. भिक्खू पय्यारत्न थेरो,नांदेड
पू. भिक्खू रेवत थेरो, मन्नाखेळी , बीदर
पू. भिक्खू प्रशीलरत्न गौतम थेरो,गुजरात
पू. भिक्खू महाविरो थेरो,काळेगाव
पृ. भिक्खू पय्याबोधी थेरो, खुरगाव
पू. भिक्खू मुदितानंद थेरो,परभणी
पू. भिक्खू सुभूती थेरो,नांदेड़
पु. भिक्खू नागसेन थेरो,औरंगाबाद
पू. निक्खू नंद थेरो,औरंगाबाद
पू. भिक्खू धम्मबोधी थेरो, औरंगाबाद
पू. भिवखू शीलरत्न थेरो, नांदेड
पू. भिक्खू संघपाल थेरो, नांदेड
पू. भिक्खू अस्सजी थेरो, दाभाड
पू. भिक्खू विनयशील लातूर
पू. भिक्खू नागसेन बोधी, उदगीर
पू. भिक्खू रत्नप्रिय मुंबई
पू. भिक्खू बोधीधम्मा, बेंगलोर
पू. भिक्खू सुमेध नागसेन, खरोसा
पू. भिक्खू धम्मसार किल्लारी
पू. भिक्खू रेवतबोधी, नांदेड
पू. भिक्खू संघप्रिय, नांदेड
पू. भिक्खू धम्मबोधी लातूर
पू. भंते पय्यावंस,पूर्णा
पू. भंते संघरत्न, देवगाव फाटा,सेलू
पू. भंते बुद्धभूषण, दाभड
पू. भंते बुद्धशील, लातूर
पु. भंते बोधिराज, लातूर

नियोजन कार्यकारिणी

मार्गदर्शक : पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो
अध्यक्ष तथा मुख्य संयोजक : पु. भिक्खु पय्यानंद थेरो उपाध्यक्ष : एम. एम. बलांडे, प्रा. श्रीहरी तलवारे, किशोर कांबळे, संजय सोनकांबळे, विठ्ठल जाधव, ॲड. सुनिल कांबळे,
सुनिल बनसोडे, ॲड. आनंद सोनवणे
सचिव : विश्वनाथ आल्टे
सहसचिव : डॉ विजय अजनीकर, हिराचंद गायकवाड, कुमार सोनकांबळे, पन्तपाल कांबळे, विनय जाकते,
प्रा. जितेंद्र सूर्यवंशी, प्रविण सूर्यवंशी
कोषध्यक्ष : अन्तेश्वर थोटे
संघटक : केशव कांबळे, प्रा. यु की गायकवाड, रलदीप अजनीकर, विनोद कोल्हे, प्रा. प्रविण कांबळे, विलास आल्टे,
सहसंघटक : भीमराव चौदंते, संजय ओहळ, राम कोरडे, ॲड राजकुमार गंडले, सत्यवान कांबळे, लाला सुरवसे,
नागसेन कामेगावकर, ॲड. रोहित सोमवंशी, ॲड. प्रतीक कांबळे
स्टेज समिती : अनिरुध्द बनसोडे, राजू कांबळे, सुशील सूर्यवंशी, ज्योतीराम लामतुरे, प्रा. सतिश कांवळे,
मिलिंद सोनकांबळे, सतिश मस्के, सुरेश कालेकर, राहुल शाक्यमुनी,
प्रसिद्धी समिती : रघूनाथ बनसोडे, अशोक देडे, दिपरत्न निलंगेकर, महेंद्र जोंधळे, हृनमंत गायकवाड, शिवाजी कांबळे, राजहंस कांबळे, बाळ होळीकर, मिलिंद कांबळे, अमोल इंगळे, अशोक हनवते,
प्रा. विलास घारगावकर, नितीन भाले व इतर पत्रकार बंधू स्मरणीका प्रकाशन समिती : प्रा. दुष्यंत कटारे, डॉ. संजय गवई, डॉ. अरुण कांबळे.
सजावट समिती : पंडीत सूर्यवंशी, राहुल हृमने, आम्रपाल बनसोडे, राजू आर्वीकर, विशाल वाच्डूळे, संजय राऊत, उदय सोनवणे,
दयानंद बटनपुरकर, निलेश बनसोडे, कुणाल शृंगारे, सुमेध कांबळे,
संरक्षण समिती : राजाराम साबळे, अभिमन्यु लामतुरे, बालाजी आदमाने, व सर्व समता सैनिक दल
सल्लगार समिती : भरत कांबळे, प्रा. मिलिंद माने, ए. डी. सोनकांबळे, तानाजी माटे, विभीषण माने, बाबुराव गायकवाड,
जे.जे गायकवाड, डॉ. सी. टी. कांबळे, सुधाकर कांवळे, डि. टी. सूर्यवंशी, उमाकांत महालिंगे, अशोक शिंदे,
भगवान सराटे, संजय कांबळे, ॲड. एस. एन. बोडके, अमृतराव सुर्यवंशी, आर. पी गायकवाड, व्हि. एम. भोसले, डी.टी सोनकांबळे, प्रा. एस. एन. गायकवाड, के. एल. सिरसाठ, आत्माराम मोरे, रमेश श्रृंगारे, उत्तम कांबळे,
प्रा.यु.टी. गायकवाड, एन. सी. काकडे, शिवाजी कवठेकर, ॲड. टी. एस. कांबळे, चिंतामण सवाई, वसंत वाघमारे,
गणपतराव कदम, प्रा. अभिमन्यु सवाई, वसेत सुर्यवशी, नागोराव बोरीकर, पी. के. वाघमारे, प्रा. के. ओ. गवई,
एन.डी. सोनकांबळे, सोपान बोडके, सूर्यभान लातूरकर, सोपान दुमणे, नरसिंग गायकवाड
ॲड. बुधोडकर, ॲड. सुभेदार मादळे, प्रा. राजकुमार उस्तुरे, ॲड. डी. एन. भालेराव, उद्यभान गायकवाड.
आरोग्य समिती
: डॉ. सदानंद कांबळे, डॉ. रवींद्र भालेराव, डॉ. अंवादास कारेपूरकर, डॉ. महेंद्र सोनवणे, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. सुनिल होळीकर, डॉ. शार्दुल शिंदे, डॉ. अभिजीत बनसोडे, डॉ. अनुज इंगोले, डॉ. संतोष भडिकर ,
डॉ. सचिन कांबळे, डॉ. निखिल सोनकांबळे, व सर्व डॉक्टर्स मिरवणूक समिती : आनंद डोनेराव ,मिलिंद धावारे असित कांबळे, ॲड. रमक जोगदंड, इंजि. सचिन गायकवाड, जयंत कांबळे, ॲड. सचिन कांबळे, गौतम सोनवणे, सुरेंद्र कांबळे, नितीन गायकवाड, प्रेमसागर गायकवाड, वैभव सुरवसे, करण ओहळ, राहुल सोनवणे, संतोष कसबे, : नागेश जोगदंड, प्रेमसागर गायकवाड, सिद्धांत मोरे, शांतरक्षित सुरवसे, प्रा. रवींद्र राजेगावकर, राहुल शाक्यमुनी,
स्वयंसेवक समिती :
आनंद कांबळे, सचिन सुरवसे, डॉ. जितेंद्र वाघमारे, गौतम सुर्यवंशी, संदीपान गायकवाड, कबीर मस्के, सुशील सुर्यवंशी, समाधान सुर्यवशी, नवनाथ कांबळे, असितकुमार कांबळे, सिध्दांत मोरे, गौतम सोनवणे, बालाजी धायगुडे, सत्यवान जोगदंड, कैलास क्षिरसागर, रंजय कांबळे, विजय थेंडे, नितीन गायकवाड, अशिष कांबळे, राहुल गायकवाड, भुपाल कांबळे, ॲड. धम्मदीप बलांडे, राजू सकपाळ, बाबा गायकवाड, जे. जे. गायकवाड, दाजीराव कांबळे, विश्वास कांबळे, अभंग कांबळे, अनिरुध्द वाघमारे, सचिन सुरवसे, विजय घनधाचे, यशपाल मस्के, रोहित शृंगारे, सिद्धांत चिकटे, नीरज सुरवसे, मारुती धनगावकर
स्वागत समिती
: डी जी बनसोडे, लक्ष्मण कांबळे, प्रा. अनंत लांडगे, आर. ई. सोनकांबळे पृथ्वीराज सिरसाठ, ॲड. बाबासाहेब गायकवाड, बसवंत उबाळे, डॉ. सुरेश वाघमारे, डॉ. जि. के डोंगरगावकर, श्रीहरी कांचळे, अशोक कांबळे, चंद्रकांत चिकटे, मोहन माने, डॉ सुधाकर गुळवे, बालाजी कांचळे, ॲड, मल्लिकार्जुन करडखेलकर, इंजि. अनिल बनसोडे, हणमंत जाकते, डी. एस. नरशिंगे, डॉ शिवाजी गायकवाड, विनोद खटके, ॲड. दीपक साठे, सुशील चिकटे, संतोष सूर्यवंशी, राजकुमार होळीकर, प्रा. रामराव गवळी, संतोष वाघमारे, पंकज काटे, साधु गायकवाड, रणधीर सुरवसे, शाम मस्के, कांचन अजनीकर, विकास वाघमारे, दीप्ती खंडागळे, प्रविण अंबुलगेकर, नितीन वाघमारे, इंजि.एम. एन. गायकवाड, प्रा. बापु गायकवाड, डॉ. श्रीकांत गायकवाड, डॉ. हर्षवर्धन कोल्हापुरे प्रा. युवराज गायकवाड, डॉ. लहू वाघमारे, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, इंजि. संजय सावंत,
ॲड. लहू सुरवसे, बबन बगे, ॲड. महेंद्र इंगळे, भारत आदमने, डॉ अशोक नारनवरे, अजय गायकवाड, प्रा. कल्याण कांबळे, व्हि. आर. बोरीकर, सहदेव मस्के, राजेसाहेब सवाई, अशोक चिकटे, व्ही. के. आचार्य, ॲड. अतीश चिकटे, डॉ एस एन शिंदे, प्रा. विष्णू वेधे, प्रा. विलास गुत्तीकर, अनिल गायकवाड, डॉ मा ना गायकवाड, एल के पवार, प्रा. वेंकट दंतेराव, देवानंद मानलेडकर,
गौतम टाकळीकर, कॉ. विश्वाभर भोसले, राजु माने, किशोर गायकवाड, मुकुंद हालसे, कॅप्टन माधव कांबळे, एम एच सागर, आर. पी गायकवाड, प्रा. शिवशरण हावळे, डॉ बाळासाहेच गोडबोले, प्रा. दादाराव घसवाडीकर, ॲड. संजय सितापुरे, के. डी. गायकवाड, आर एस सोनकांबळे, जी एस साबळे, प्रा. भाऊराव कांबळे, बी के भालेराव सुदाम बामणीकर, सिद्धार्थ कवठेकर, पी जी कांबळे, विजयकुमार मस्के, प्रा. राजकुमार उस्तुरे, डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी, डॉ. जितेंद्र वाघमारे, ए.पी. कांबळे, चंद्रकांत शिंदे, बाबा कांबळे, मनोज सूर्यवंशी,
महिला समिती
: सुनिता गायकवाड, सुजाता अजनीकर, आशा चिकटे, मंगल सातपुते, बिमल डुमणे, शोभा सोनकांबळे, शशिकला सुरवसे, शकुंतला नेत्रगावकर, अर्चना आल्टे, कांचन अजनीकर, पंचशीला बनसोडे, निर्मला तोटे, लक्ष्मी बटनपुरकर, दीप्ती खंडागळे, मेगल कांबळे, लताबाई चिकटे, शारदा वाघमारे, पंचशीला डावकर, निर्मला गौरकर, लताबाई डुमणे, सुकुमार कांबळे, करुणा सूर्यवंशी, कमल गाडे, उषा वाघमारे, मंदाकिनी गोडबोले मीना कदम, अनुसया कांबळे, सरिता बनसोडे, शीलाताई वाघमारे, सुमन उदानसिंग, ललिता गायकवाड, शोभा महालिंगे, प्रणिता वाघमारे, वैशाली गायकवाड, संजीवनी गडेराव, देवशाला गायकवाड, कांताबाई सरोदे, छाया कांबळे, मीनाक्षी गंडले, कांताबाई सरोदे, हेमलता गायकवाड, अनुराधा कांबळे, विद्या आल्टे, माया टिळक, विमल गायकवाड, हेमलता गायकवाड, शालुबाई मस्के, बेबीताई कांबळे, आशा उड्डाणसिंग, जयश्री वाघमारे, कविता धावारे, मंगल सातपुते, गयाबाई पाले, छाया उचाळे व सर्व नगरातील महिला मंडळ.






# रमेश तात्या गालफाडे यांना जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे

केज /प्रतिनिधी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना केज विधानसभा मतदारसंघात जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे कारण सत्ताधारी पक्षाने स्वतःचेच हित साधून घेतले आहे तरी जनतेतून परिवर्तनाची मागणी होत आहे सतत तेच उमेदवार निवडून केज मधून घराणेशाही हद्दपार करण्याची मागणी जनतेतून होत आहे मागील पाच वर्षांमध्ये विकास काहीच झालेला नसून आमदार मात्र स्वतःचेच हित साधून घेत आहे तर केज तालुक्याचा विकास काही झालेला दिसून येत नाही तालुक्यामध्ये केस तालुक्यामधून नवीन चेहरा निवडून आला पाहिजे अशी जनतेतून मागणी होत आहे तरी बहुजन विकास परिषदेचे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना जनतेतून चांगला प्रतिसाद भेटत आहे खास करून युवावर्ग महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि रमेश तात्या गालफाडे यांच्या पाठीशी उभा राहिलेला दिसून येत आहे केज तालुक्यात सर्वसामान्याचे अनेक प्रश्न आणि अनेक समस्या अनेक वर्ष झाले तरी केज तालुक्याचा विकास मात्र काही झालेला दिसून येत नाही बेरोजगारी तरुणांना काम नाही मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे ऊस तोडून मजुराचे प्रश्न पाणी प्रश्न असे अनेक प्रश्न आहेत केज अंबाजोगाई तालुक्यामध्ये चांगला प्रतिसाद भेटत आहे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या नेतृत्वात केज कायापालट करू विकास काय असते हे दाखवून देऊ असे आश्वासन रमेश तात्या गालफाडे यांनी जनतेला दिले आहे




# कोणत्याही पदार्थांमध्ये दह्याचा सतत वापर करणं ठरू शकतं घातक? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत

भारतीय खाद्यपदार्थांमध्ये दही हादेखील एक प्रमुख पदार्थ आहे. दही त्याच्या आरोग्यदायी फायद्यांमुळे ओळखला जातो. दही साध्या अन्नपदार्थांपासन ते रायता, चाट अशा विविध पदार्थांमध्येही वापरले जाते. परंतु तज्ज्ञांच्या मते, दह्याचे सेवन सर्व प्रकारच्या अन्नपदार्थांबरोबर करणे आरोग्यासाठी योग्य मानले जात नाही. मुख्य म्हणजे ज्या व्यक्तींची पचनशक्ती खूप कमकुवत असते. त्यांनी दह्याचे सेवन जपून करायला हवे. विविध पदार्थांबरोबर केले जाणारे दह्याचे कॉम्बिनेशन टाळणे का गरजेचे आहे याबाबत, इंडियनएक्स्प्रेस.कॉमशी संवाद साधताना बंगळुरू येथील एस्टर व्हाईटफिल्ड हॉस्पिटलमधील मुख्य क्लिनिकल आहार तज्ज्ञ वीणा व्ही. यांनी सांगितले.

मसालेदार अन्नपदार्थांसह दही बिर्याणीच्या चाहत्यांसाठी रायता किंवा साधे दही अनेकदा तो पदार्थ खाताना अधिक रुचकर लागावा यासाठी वापरले जाते. परंतु मसालेदार पदार्थांसह दही वापरणे सर्वांसाठी योग्य नाही. थंड दही आणि गरम मसाल्यांमधील तापमानातील फरकामुळे पचनास त्रास होऊ शकतो; विशेषत: संवेदनशील पचनशक्ती असलेल्या व्यक्तींमध्ये. हा संयोग हानिकारक आहे, असे सूचित करणारा कोणताही पुरावा नाही. मात्र, संवेदनशील पचनशक्ती असलेल्या काही व्यक्तींना विरोधाभासी तापमानामुळे अस्वस्थता जाणवू शकते, असे वीणा यांनी सांगितले. ज्यांना इरिटेबल बोवेल सिंड्रोम (आईबीएस), आईबीडी किंवा ॲसिड रिफ्लक्स यांसारख्या पाचक स्थिती आहेत, त्यांना हे पदार्थ खाताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कारण– या व्यक्तींना मसालेदार पदार्थांसोबत दही खाल्ल्यास प्रकृती बिघडल्याची लक्षणे जाणवण्याची अधिक शक्यता असते. बुंदी रायता बुंदी रायता हा एक लोकप्रिय पदार्थ आहे. परंतु, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे की, बुंदी तळलेली असते आणि त्यात अतिरिक्त चरबी आणि कॅलरीज असतात. आयुर्वेदिक तत्त्वांनुसार, दही हे आंबट आणि जड मानले जाते; तर तळलेले पदार्थ जड आणि पचायला कठीण मानले जातात. हे पदार्थ एकत्र केल्यावर ते पचन प्रक्रियेत अडथळा आणतात, असे वीणा यांनी स्पष्ट केले आहे. आयुर्वेदाने असे 'जड' पदार्थ एकत्र करण्यापासून सावध केले असले तरी बुंदी रायत्याबाबतची मुख्य चिंता म्हणजे त्यात चरबीचे प्रमाण जास्त असते. काकडी रायता उन्हाळ्याच्या दिवसांत शरीर थंड ठेवण्यासाठी अनेक जण काकडी रायत्याचे सेवन करतात. आयुर्वेदात असे सांगण्यात आले की, काकडी आणि दही एकत्रितपणे खाल्ल्याने छातीत कफ तयार होऊन, पचनात व्यत्यय येऊ शकतो; ज्यामुळे सायनसचा रक्तसंचय होण्याची शक्यता असते. मात्र, आधुनिक पोषण या दाव्याचे समर्थन करीत नाही आणि काकडी रायता हा एक आरोग्यदायी पर्याय मानला जातो. कारण– त्यामुळे हायड्रेशन, फायबर व प्रो–बायोटिक्स प्रदान केले जाते, असे वीणा यांनी सांगितले. पदार्थांमध्ये निरोगी वेगळेपणा आणण्यासाठी वीणा यांनी गाजर रायता, पुदिना रायता आणि अगदी कांदा रायता यांसारख्या पर्यायांची शिफारस केली आहे.



# उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तीन वेळा होणार तपासणी

## विधानसभा मतदारसंघ निहाय वेळापत्रक जाहीर

लातूर, दि.०५ : विधानसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक विषयक खर्चाच्या नोंदवहीची तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक यांच्याकडून निवडणूक काळात तीन वेळा केली जाणार आहे. यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात ही तपासणी नेमून दिलेल्या दिवशी सकाळी १० वाजता होईल. तरी खर्च तपासणीसाठी उमेदवार, प्रतिनिधींनी वेळापत्रकानुसार दिलेल्या दिवशी, ठिकाणी व वेळेला उपस्थित राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा खर्च सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांनी केले आहे.

उदगीर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची पहिली तपासणी ७ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता उदगीर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात होणार आहे.अहमदपूर, निलंगा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची पहिली खर्च तपासणी ८ नोव्हेंबर २०२४ रोजी होईल. तसेच लातूर ग्रामीण, लातूर शहर आणि औसा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च तपासणी ९ नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे.

दुसरी तपासणी १२ नोव्हेंबर २०२४ पासून सुरु होणार असून या दिवशी लातूर ग्रामीण आणि लातूर शहर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी होईल. १३ नोव्हेंबर २०२४ रोजी अहमदपूर, उदगीर, निलंगा आणि औसा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी होणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२४ रोजी लातूर ग्रामीण आणि लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तिसरी तपासणी होईल. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी अहमदपूर, उदगीर, निलंगा आणि औसा या विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची तपासणी होईल. या वेळापत्रकानुसार दिलेल्या दिनांकास उमेदवारांनी स्वत: किंवा त्यांचे प्राधिकृत निवडणूक प्रतिनिधी यांनी खर्चाची नोंदवही, प्रमाणके, निवडणुकीसाठीच्या खर्चाचे बँक पासबुकसह व इतर आवश्यक सर्व अभिलेख्यासह सकाळी १० वाजता संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच खर्चाच्या नोंदवह्यांच्या तपासणी दरम्यान जनतेचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात आणि प्रत्येक पृष्ठासह १ रूपया इतकी रक्कम प्रदान केल्यावर कोणतीही व्यती कोणत्याही उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदवहीची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून घेऊ शकतात, असेही श्री. नागणे यांनी कळविले आहे.

## ज्या ज्या दलालांनी बहुजन समाज पार्टी ए.बी. फॉर्मचा गैर वापर केल्या बद्दल त्या पक्षाशी बेईमानी करणाऱ्या लोकांची ब.स.पा. मधून हाकालपट्टी

परभणी / प्रतिनिधी :- महाराष्ट्रातील होत असलेल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुक दरम्यान बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा परम आदरणीय सुश्री बहेन कु. मायावतीजी यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे यांच्या नेतृत्वात संपूर्ण महाराष्ट्रात २८८ जागी निवडणुक लढविण्याचा निर्णय घेतला होता. परंतू महाराष्ट्रासह परभणी जिल्हयामध्ये दलाल, हरामखोर लोकांचा सुळसुळाट पाहावयास मिळला आहे. त्यामध्ये परभणी जिल्हयाचे ब.स.पा. चे जिल्हाध्यक्ष प्रसेंजित मस्के, गौतम उजगरे, अनंता दिपके, जाफरखान पठाण, व इतर यांनी संगनमत करून ए.बी. फॉर्मचा गैर वापर केल्यामुळे या चौघांनी पक्षासोबत बेईमानी केल्यामुळे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांच्या आदेशानूसार त्या दलाल, हरामखोर लोकांची बहुजन समाज पार्टीतून हाकालपट्टी करण्यात येत आहे. तरी सर्व ब.स.पा. पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना सुचित करण्यात येते की, निवडणुकी दरम्यान या चौघांची कुठल्याही प्रकारची संबंध ठेवु नये. असे आव्हान इंजि.अनिरूध्द रणवीर महाराष्ट्र प्रदेश सचिव बहुजन समाज पार्टी यांनी केले आहे.

# विरोधकांच्या अपप्रचाराला बळी पडू नका - डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी:- निवडणुकीच्या काळात अपप्रचार करून मतदारांना भ्रमित करण्याचे काम केले जाते. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी अशा प्रचाराला बळी पडू नये,असे आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

गोजमगुंडे लॉन्स येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंडळाच्या वतीने आयोजित मेळाव्यात डॉ. अर्चनाताई पाटील बोलत होत्या.या मेळाव्यास शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे यांच्यासह माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी,शैलेश गोजमगुंडे, सरचिटणीस दिग्विजय काथवटे,राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते ड.व्यंकट बेद्रे,प्रदेश सचिव मुर्तुजा खान, जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत पाटील,शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने, पीपल्स रिपब्लिकन पार्टी (जोगेंद्र कवाडे) गटाचे आर.टी.कांबळे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष मोहसीन खान यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, निवडणुकीच्या काळात विकास कामांवर न बोलता मतदारांची दिशाभूल करण्याचे काम केले जाते.या निवडणुकीतही विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे.सोशल मीडियाच्या माध्यमातूनही अपप्रचार सुरू आहे. महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या काळात सतर्क रहावे. कुठल्याही प्रकारची गडबड होऊ शकते,याची जाणीव ठेवा.अफवांना बळी पडू नका. प्रचारादरम्यान आपण विकास कामांवर बोलतो. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना नागरिकांना समजावून सांगा.लाडकी बहीण, प्रधानमंत्री आवास योजना यासारख्या योजनांची माहिती नागरिकांना द्या,असे आवाहनही त्यांनी केले.

दि.२० नोव्हेंबर रोजी कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून महायुतीचे सरकार आणण्यासाठी मदत करा,असे आवाहनही त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना केले.

यावेळी बोलताना ड. बेद्रे यांनी निवडणूक जिंकण्यासाठी सर्व घटक पक्ष एकदिलाने काम करत असल्याची ग्वाही दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनिशी डॉ. अर्चनाताईंच्या पाठीशी उभा असल्याचे ते म्हणाले.प्रशांत पाटील यांनी शहराच्या पूर्व भागातील प्रश्नांसंदर्भात स्थानिक नेतृत्वाने काय केले ? असा अहवाल उपस्थित केला.निष्क्रिय नेतृत्वाला घरी बसवण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घ्यावेत,असे आवाहनही त्यांनी केले.

सचिन दाने यांनी विधानसभेवर पुन्हा एकदा महायुतीचा भगवा फडकणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी आता मतदानासाठी अल्प काळ शिल्लक असून अर्चनाताईंच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी झोकून देण्याचे आवाहन केले.मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे यांनी शहराच्या पूर्व भागातून मताधिक्य मिळवून देण्याचा विश्वास यावेळी व्यक्त केला.या मंडळात ६५ बुथ आणि २४ शक्ती केंद्र आहेत.या सर्व बुथवर ताईंना मताधिक्य देण्याची ग्वाही त्यांनी दिली.

या मेळाव्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंडळातील सर्व बुथ प्रमुख,शक्ती केंद्रप्रमुख, पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विडा जिल्हा परिषद गटात पृथ्वीराज साठेचा झंजावात दौरा; पृथ्वीराज साठे यांना जनतेचा मोठा प्रतिसाद



केज/प्रतिनिधी विडा जिल्हा परिषद गटात मा विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठेचा झंजावात दौरा, पृथ्वीराज साठे यांना जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या पाच वर्षापासून मी मतदार संघात जनतेच्या सेवेसाठीतत्परतेने कार्य केले आहे यामुळे मला मतदारसंघात जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच आमच्या प्रतिनिधी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आमदार साठे यांनी सांगितले की, मी सर्वसाधारण घरातील व्यक्ती असून आम्हाला मतदारसंघातील सर्वसाधारण जनतेच्या समस्या माहित आहेत त्या समस्या सोडवण्यासाठी मी तत्पर राहील. तसेच गेल्या ३० वर्षापासून मुदडा घराण्यात सत्ता आहे परंतु सत्तेचा वापर फक्त स्वतःच्या हितासाठी केलेला आहे असे बोलताना पृथ्वीराज साठे यांनी स्पष्ट केले आहे यापुढे मतदारसंघात रखडलेल्या कामाचा पाठपुरावा करून मार्गी लावण्यासाठी मी विधानसभेत आवाज उठवेल असेही उमेदवार पृथ्वीराज साठे यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे मला मतदारसंघात जनतेचा भरभरून पाठिंबा मिळत आहे यापुढे मतदारसंघातील सर्व जनते सोबत राहील असे आश्वासित केले.

# प्रस्थापित व्यवस्था उलथण्यासाठी 'मेरा बूथ सबसे मजबूत' करा : बूथ प्रमुखांच्या बैठकीत वंचितचे उमेदवार विनोद खटके यांचे आवाहन





लातूर :- आपला विरोधक दिग्गज आहे, खानदानी राजकारणी आहे. हे आधी डोक्यातून काढून टाका. प्रत्येक बूथ प्रमुखांनी आपले बूथ मजबूत करावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे लातूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार विनोदभाऊ खटके यांनी येथे केले. आज ५ नोव्हेंबर रोजी विनोद खटके यांच्या मुख्य प्रचार कार्यालयाचे गोजमगुंडे लौन्स येथे जंगी उदघाटन झाले.. त्यानंतर झालेल्या बूथ प्रमुखांच्या व्यापक बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे स्टार प्रचारक ॲड. सर्वजीत बनसोडे, मराठवाडा महासचिव रमेश गायकवाड, संतोष सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष सलीम सय्यद, शहराध्यक्ष सचिन गायकवाड, शहर महिला अध्यक्ष सुजाता आजनिकर यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. प्रभाग १०, ११,१२,१३,१४ आणि प्रभाग १ ते ७ या प्रभागातील बूथ प्रमुखांची दोन सत्रात बैठक झाली.

यावेळी उमेदवार विनोद खटके म्हणाले, समोर कोण उमेदवार आहे यांची चिंता करू नका, आपला बूथ मजबूत करा. आता पर्यत ३८८ बूथचे नियोजन झाले आहे. तर स्टार प्रचारक ॲड. सर्वजीत बनसोडे यांनी बूथ प्रमुखांना संपूर्ण प्रशिक्षण दिले.. दिग्गज उमेदवार आतापर्यंत पडले आहेत. लोकांना यावेळी बदल हवा आहे. त्यासाठी बूथ प्रमुखांनी प्रामाणिकपने काम करावे, कामाला लागावे. सगळ्या निवडणुका पैशाने होतं नाहीत.. कितीही मोठा नेता असू द्या, कितीही पैसा असू द्या.. विलासराव देशमुख देखील पडले आहेत. आताशा पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे देखील पडले आहेत. त्यासाठी आपणास मुळातून काम करणे गरजेचे आहे.विनोद खटके यांचीच सद्या हवा आहे. यांचा अर्थ लातूरच्या लोकांना बदल हवा आहे. पैशाचा मुकाबला पैशानं करता येणार नाही. माणसाना गृहीत धरून चालणार नाही. बूथ मजबूत करावे लागेल. सर्व बूथ प्रमुखांनी मीच उमेदवार आहे असे समजून घरा घरात जाऊन पटवून सांगा परिवर्तन का आवश्यक आहे. असे आवाहन ॲड. बनसोडे यांनी यावेळी केले. यावेळी मोठ्या संख्येने बूथ प्रमुख उपस्थित होते.

# किनवट विधानसभेत १२ जणांची माघार ; आता १७ उमेदवार निवडणूक रिंगणात


किनवट/शेख शौकत :-सोमवारी दि. ४ नोव्हेंबर २००४ रोजी १२ जणांनी नामनिर्देशन पत्रे माघार घेतल्याने आता ८३-किनवट विधानसभा मतदार संघात १७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अशी माहिती सहायक जिल्हाधिकारी तथा ८३-किनवट विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी दिली.

८३-किनवट विधानसभा मतदार संघात ३१ इच्छूकांनी ४५ नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. छाननीच्या दिवशी निरंजन केशवे व भीमराव पाटील हे ०२ उमेदवार अवैध ठरले होते व पुढील प्रमाणे २९ उमेदवार वैध ठरले होते. गंगाधर माल्लाजी सर्पे-बहुजन समाज पार्टी, जाधव प्रदीप नाईक- नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, भीमराव रामजी केराम- भारतीय जनता पार्टी, अशोक संभाजीराव ढोले- रिपब्लिकन पक्ष खो.रि.पा., डॉ. आमले पुंडलीक गोमाजी- वंचित बहुजन आघाडी, स. इमरानसली-इंडीयन नॅशनल लीग, गोविंद सांबन्ना जेठेवार- राष्ट्रीय समाज पक्ष, अर्जुन किशन आडे -अपक्ष, आडकिने संतोष माधव-अपक्ष, किशन दामा राठोड-अपक्ष, किसन विठ्ठलराव मिराशे-अपक्ष, जयवंता केसर पवार-अपक्ष, जाधव सचिन माधवराव (नाईक) -अपक्ष, जाधव सपना सचिन (नाईक) -अपक्ष, जितेंद्र अनिलराव कुलसंगे-अपक्ष, डॉ. दत्ता मारुती धनवे-अपक्ष, दिलीप धरमसिंग जाधव नाईक-अपक्ष, धरमसिंग दगडू राठोड-अपक्ष, धावारे राजेश नारायण-अपक्ष, ड. प्रदिप देवा राठोड-अपक्ष, बेबीताई प्रदीप जाधव-अपक्ष, यादव जाधव-अपक्ष, विजय काशीनाथ खुपसे-अपक्ष, विश्वनाथ कदम पाटील-अपक्ष, शेख फय्याजोद्दीन फक्रोद्दीन-अपक्ष, सयद शफियोदीन स. करिमोदीन-अपक्ष, संदिप निखाते-अपक्ष, संदीप पाटील कऱ्हाळे-अपक्ष, संध्या प्रफुल राठोड-अपक्ष.

सोमवारी (ता. ०४ नोव्हेंबर २००४) नामनिर्देशन माघार घेण्याच्या दिवशी वैध ठरलेल्या पैकी १२ माघार घेतलेल उमेदवार पुढील प्रमाणे : धरमसिंग दगडू राठोड, आडकिणे संतोष माधव , बेबीताई प्रदिप जाधव , जाधव सपना सचिन (नाईक) ,यादव लिंबाजी जाधव , संध्या प्रफुल राठोड ' डॉ. दत्ता मारुती धनवे , अर्जुन किशन आडे , किसन विठ्ठलराव मिराशे ,किशन दामा राठोड, विश्वनाथ खंडु कदम, सयद शफियोदीन स. करिमोदीन

आता प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात असलेल उमेदवार : गंगाधर माल्लाजी सर्पे ( बहुजन समाज पार्टी), जाधव प्रदीप नाईक ( नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी शरदचंद्र पवार), भीमराव रामजी केराम (भारतीय जनता पार्टी), अशोक संभाजीराव ढोले (रिपब्लिकन पक्ष खो.रि.पा.), डॉ. आमले पुंडलीक गोमाजी (वंचित बहुजन आघाडी), स. इमरानसली (इंडीयन नॅशनल लीग), गोविंद सांबन्ना जेठेवार ( राष्ट्रीय समाज पक्ष), जितेंद्र अनिलराव कुलसंगे(अपक्ष), जयवंता केसर पवार (अपक्ष), जाधव सचिन माधवराव (नाईक) (अपक्ष), दिलीप धरमसिंग जाधव नाईक (अपक्ष ) , धावारे राजेश नारायण (अपक्ष), ड. प्रदिप देवा राठोड (अपक्ष), विजय काशीनाथ खुपसे (अपक्ष), शेख फय्याजोद्दीन फक्रोद्दीन (अपक्ष), संदिप निखाते (अपक्ष), संदीप पाटील कऱ्हाळे (अपक्ष)

# मांडवीच्या वनक्षेत्रपालास निलंबित करण्याची मागणी बिबट्या मृत्यू अन् मृतदेह बेपत्ता प्रकरणी



किनवट/शेख शौकत :-मांडवी वनपरिक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार होऊन आणि त्याचा मृतदेह बेपत्ता होण्याच्या घटनेला आज चार दिवस होऊन गेल्यानंतरही त्या बिबट्याचे शव सापडलेच नाही. तपासात अक्षम्य दुर्लक्ष करणारे मांडवीचे वादग्रस्त वनक्षेत्रपाल राजेश जयपूरकर यांना निलंबीत करुन चौकशी करण्याची मागणी वनप्रेमींनी केली आहे. मांडवी वनपरिक्षेत्राचे वनक्षेत्रपाल जयपुरकर हे मुख्यालयी हजर राहतच नाही. मांडवीच्या जंगलव्याप्त भागाला तार कंपाउडसाठी मोठा निधी आला, पण याकामात ही या महाशयाणे मोठा भ्रष्टाचार केल्याने कामे निकृष्ट व दर्जाहीन केल्याने पोल पडले, तार ही उखडून गेली आहे. त्यातच त्यांची बदली सामाजिक वनिकरण भोकर येथे होऊन दोन महिने होऊन गेल्यानंतरही ते आपल्या मांडवी येथील पदालाच चिटकून बसले आहेत, पण ते मुख्यालयी हजर राहत नाही तर वनपाल आणि इतर कर्मचारी उपस्थित राहून या जंगलाचे संरक्षण कसे करणार? या संपूर्ण घटनेला जबाबदार असणाऱ्या जयपूरकर यांना विनाविलंब निलंबित करून त्यांच्या कार्यकाळात झालेली दर्जाहीन कामे बिबट्या मृत्यू प्रकरण आदींची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि मांडवी येथून त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे, अशी मागणीही वनप्रेमी जनतेकडून केली जात आहे. दरम्यान वनक्षेत्रपाल यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल बंद होता.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE